तरुण भारत संवाद बुधवार, २३ एप्रिल २०२५

# 'वसुंधरा रक्षणासाठी युवकांनी सहभागी व्हावे'

**कोल्हापूर :** हवामान बदल, प्रदूषण, लोकसंख्या वाढ वृक्षतोड इत्यादीमुळे आज पृथ्वीवरील अवघ्या मानव जातीसमोर मोठे संकट



उभे ठाकले आहे. मोठ्या प्रमाणात जैवविविधता ऱ्हास होत आहे. यासाठी युवकांनी या सुंदर अशा वसुंधरेच्या शाश्वत भविष्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात छोट्या छोट्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. वसुंधरा रक्षणासाठी युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. गोवर्धन उबाळे यांनी केले.

वसुंधरा दिनानिमित्त विवेकानंद महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'पर्यावरण संवर्धनामध्ये युवकांची भूमिका' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी प्रा. शिल्पा भोसले होत्या. डॉ. उबाळे म्हणाले, वृक्षारोपण, ऊर्जेची बचत, पाण्याचा जपून वापर करावा. 'वसुंधरा माझी माता' या कवितेचे वाचनही त्यांनी केले. प्रास्ताविक प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. आभार प्रा ए. आर. धस यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. एस. पी. वेदांते व प्रा. ए. बी. गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा. व्ही. एन. कुलकर्णी, प्रा. यू. आर. हिरकुडे, प्रा. यू. एच. तिजाईकर, प्रा. डी. आर. पाटील, प्रा. एस. एस. देशपांडे, प्रा. एस. ए. रोटे, प्रा. पी. वाय. राठोड, प्रा. जे. आर. भरमगोंडा, प्रा. बी. एस. कोळी, आदी उपस्थित होते.

23/4/2025

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २३ एप्रिल २०२५

# वसुंधरा रक्षणासाठी युवकांनी योगदान द्यावे : डॉ. उबाळे

कोल्हापूर : हवामान बदल, प्रदूषण, लोकसंख्यावाढ, वृक्षतोडीमुळे पृथ्वीवरील मानव जातीसमोर मोठे संकट आहे. मोठ्या प्रमाणात जैवविविधता ऱ्हास होत आहे. यासाठी युवकानी वसुंधरेच्या शाश्वत भविष्यासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन भूगोल विभागप्रमुख डॉ. गोवर्धन उबाळे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयामध्ये वसुंधरा दिनानिमित्त 'पर्यावरण संवर्धनामध्ये युवकांची भूमिका' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. शिल्पा भोसले होत्या. यावेळी पर्यावरण विभागाकडून देशी वृक्ष बिया संकलन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रा. ए.आर. धस यांनी आभार मानले. प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. ए. बी.गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. व्ही. एन. कुलकर्णी, प्रा. यू. आर. हिरकुडे, प्रा. यू. एच. तिजाईकर, प्रा. डी. आर. पाटील, प्रा. एम. एस. देशपांडे उपस्थित होते.